**(महाराष्ट्र पोलीस राजपत्र विभागीय भाग-६ अ करिता)**

क्र.पोमसं/४/१०/७/ सेवाज्येष्ठता/१२/२०१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई-४०००01
दिनांक - ८/०३/२०१६

संदर्भ - या कार्यालयाचे समक्रमांक दि.११/०२/२०१६ चे आदेश

**- - - - - आदेश - - - - -**

या कार्यालयाचे क्र.पोमसं/५/१९७६/२००३, दि.३१/०८/२०१५ च्या आदेशान्वये एकूण ४७७ पो.उप.निरीक्षकांना दि.२२/०३/२००० ची सेवाज्येष्ठता देण्यात आली आहे.

२. तद्नंतर या कार्यालयाचे संदर्भाधीन दि.११/०२/२०१६ च्या आदेशान्वये ४७७ पोलीस अधिकाऱ्यांपैकी निधन झालेले / निलंबनात असलेले / सेवानिवृत्त झालेले / अद्याप पोलीस उप निरीक्षक असलेले, यांची नावे वगळून उर्वरित ४१७ सहायक पोलीस निरीक्षकांना दि.२४/०८/२००९ रोजीचा मानीव दिनांक मंजूर करण्यात आला असून त्यांची सेवाज्येष्ठता सहायक पोलीस निरीक्षक संवर्गात तत्कालीन सपोनि जोगदंड अजय विनायकराव यांचे लगत खाली निश्चित करण्यात आली आहे.

३. सदर ४१७ पोलीस अधिकाऱ्यांपैकी खालील तक्त्यातील १४ पोलीस अधिकाऱ्यांना स्तंभ क्र.३ मध्ये नमूद केलेल्या अभिप्रायानुसार संदर्भाधीन आदेशान्वये देण्यात आलेला दि.२४/०८/२००९ रोजीचा मानीव दिनांक / सेवाज्येष्ठता या आदेशाद्वारे **रद्द** करण्यात येत आहे.

| दि.११/०२/२०१६ च्या आदेशातील अ.क्र. | सपोनि यांचे नांव | अभिप्राय |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| ७४ | मुरलीधर नारायण खर्चे | पोउपनि या पदावरुन दि.३०/०६/२०११ रोजी सेवानिवृत्त झाल्याने. |
| ८१ | भगवान लक्ष्मण गेंगजे | पो.उप.निरीक्षक पदावर कार्यरत असतांना दि.११/०२/२००३ रोजी निधन झाल्याने. |
| ८२ | शांताराम सखाराम तळवडेकर | पो.उप.निरीक्षक पदावर कार्यरत असतांना त्यांचे दि.२४/०७/२००८ रोजी निधन झाले असल्याने. |
| ८६ | विजय पांडूरंग पवार | श्री.पवार हे शासकीय सेवेत अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून नियुक्त झाले आहेत. त्यांची अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून जात प्रमाणपत्राची वैधता अद्यापी झालेली नाही. त्यांना मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून दि.२२/०६/२०१५ च्या आदेशान्वये सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांनी (हिंदू ठाकूर) या अनुसूचीत जमाती प्रवर्गाची जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून मानीव दिनांक देण्यात येईल असे या कार्यालयाचे क्र.पोमसं/४/१०/७/से.ज्ये.पवार/ ९४/२०१५, दि.१/०८/२०१५ च्या ज्ञापान्वये कळविण्यात आले आहे. |
| १०३ | गोपाळकृष्ण वासुदेव नंदनवार | पोउपनि या पदावरुन दि.३०/०६/२००९ रोजी सेवानिवृत्त झाल्याने. |
| १०६ | रामकृष्ण पंढरीनाथ मांडवडे | पोउपनि या पदावरुन दि.३१/०८/२००६ रोजी सेवानिवृत्त झाल्याने. |
| २२९ | रावसाहेब दगडू पवार | अद्याप पो.उप.निरीक्षक पदात कार्यरत असल्याने. |
| २३० | विजय काका ठाकर | श्री.ठाकर हे शासकीय सेवेत अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून नियुक्त झाले आहेत. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. त्यांना या कार्यालयाचे दि.२०/११/२०१२ च्या आदेशान्वये सपोनि पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे त्यांना पो.आ, बृहन्मुंबई यांनी पदोन्नतीवर कार्यमुक्त |

| | | |
|---|---|---|
| | | केलेले नव्हते. या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/१४-अ/६७/एम्एन्/१२९/२०१४, दि.१/०९/२०१४ मधील तरतूदीनुसार त्यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे अधीन राहून पो.आ, बृहन्मुंबई यांनी सपोनि पदावर हजर होण्याकरिता कार्यमुक्त केले असून त्यांनी दि.२०/०१/२०१५ रोजी बृहन्मुंबई येथे सपोनि पदाचा कार्यभार स्विकारला आहे.<br>त्यामुळे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे. |
| २३२ | तुकाराम शंकर कोयंडे | श्री.कोयंडे यांना सपोनि पदावर पदोन्नती देण्यासाठी सन २०१० च्या निवडसूचीवर विचार करण्यात आला होता. त्यावेळी ते वेतनवाढीची शिक्षा भोगत असल्यामुळे त्यांना विभागीय पदोन्नती समितीने पात्र ठरवून **सिल लखोटाबंद** असे अभिप्राय दिल्याने त्यांना पदोन्नती देण्यात आली नव्हती.<br>त्यानंतर सन २०१४ ची पुरवणी निवडसूचीवर त्यांच्याविरुध्द कोणतीही शिक्षा प्रलंबीत नसल्याने त्यांना दि.१३/०१/२०१६ रोजी सपोनि पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यास्तव शासन निर्णय दि.२/०४/१९७६ मधील नियम ४(b)(ii) मधील तरतुदीनुसार व या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२/११/(५)/मा.ता.(इढोळे)/२७६/२००८, दि.१२/१०/२०१० मधील तरतुदीनुसार त्यांची सपोनि पदातील मुळ सेवाज्येष्ठता अद्याप निश्चित करण्यात आली नसल्याने. |
| २४५ | बाळू गोपीनाथ पितळे | सध्या पो.उप.निरीक्षक पदावर कार्यरत असल्यामुळे. |
| २७७ | वैजनाथ किसनराव मुंढे | श्री.मुंढे यांचा सपोनि पदावर पदोन्नतीसाठी सन २०१०, व २०११ च्या निवडसूचीवर विचार करण्यात आला होता. त्यावेळी त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल असल्याने व ते निलंबनात असल्याने विभागीय पदोन्नती समितीने त्यांना पदोन्नतीस **"अपात्र"** ठरविले होते. सन २०१२ च्या निवडसूचीवर त्यांचे प्रकरण **"खुले"** ठेवण्यात आले होते. सन २०१३ च्या निवडसूचीवर विभागीय पदोन्नती समितीने त्यांना **"अपात्र"** ठरविल्याने त्यांना पदोन्नती देण्यात आली नव्हती. सन २०१४ च्या निवडसूचीवर त्यांना सपोनि पदावर पदोन्नतीकरिता त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या प्राथमिक चौकशीच्या अधीन रहून विभागीय पदोन्नती समितीने **"पात्र"** ठरविल्याने त्यांना दि.२२/०६/२०१५ च्या आदेशान्वये सपोनि पदावर पदोन्नती देण्यात आली आहे.<br>त्यांची सपोनि पदातील मूळ सेवाज्येष्ठता त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंगविषयक कारवाई मुळे निश्चित करण्यात आली नसल्याने. |
| ३३८ | विजय आत्माराम सोनटक्के | श्री.सोनटक्के यांची सपोनि पदावर पदोन्नतीसाठी सन २०१० व २०११ च्या निवडसूचीवर पात्रा-पात्रता तपासली असता विभागीय पदोन्नती समितीने त्यांना पदोन्नतीकरिता आवश्यक असणारी गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **"ब"** अशी आढळून न आल्याने त्यांना त्यावेळी पदोन्नतीकरिता **अपात्र** ठरविले होते. सन २०१२ च्या निवडसूचीवर त्यांचे प्रकरण **खुले** ठेवण्यात आले होते. सन २०१३ च्या निवडसूचीवर विभागीय पदोन्नती समिती **"चेक सन ११-१२ गोपनीय अहवाल"** असे नमूद केल्याने त्यांना पदोन्नती देण्यात आली नाही. सन २०१४ च्या निवडसूचीवर त्यांना सपोनि पदावर पदोन्नतीकरिता **"पात्र"** ठरविल्याने त्यांना दि.२२/०६/२०१५ च्या आदेशान्वये सपोनि पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यास्तव शासन निर्णय दि.२/०४/१९७६ मधील नियम ४(b)(ii) मधील तरतुदीनुसार व या कार्यालयाचे |

| | | |
|---|---|---|
| | | परिपत्रक क्र.पोमसं/२/११/(५)/मा.ता.(इढोळे)/२७६/२००८,दि.१२/१०/२०१० मधील तरतुदीनुसार त्यांची सपोनि पदातील मुळ सेवाज्येष्ठता अद्याप निश्चित करण्यात आली नसल्याने. |
| ३८८ | प्रकाश पुरुषोत्तम सुर्यवंशी | श्री.सुर्यवंशी यांची सपोनि पदावर पदोन्नतीसाठी सन २०१० च्या निवडसूचीवर त्यांची २ वर्ष वार्षिक वेतनवाढ शिक्षेची अंमलबजावणी सुरु असल्यामुळे **पात्र-सिल लखोटा बंद** असा शेरा विभागीय पदोन्नती समितीने दिला असल्याने त्यांना त्यावेळी पदोन्नती देण्यात आली नव्हती. त्यानंतर सन २०११, २०१२ व २०१३ च्या निवडसूचीवर वरील कारणास्तव त्यांना पदोन्नती देण्यात आली नव्हती. त्यानंतर सन २०१४ ची पुरवणी निवडसूचीवर त्यांच्याविरुध्द कोणतीही शिक्षा प्रलंबीत नसल्याने त्यांना दि.१३/०१/२०१६ रोजी सपोनि पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. यास्तव शासन निर्णय दि.२/०४/१९७६ मधील नियम ४(b)(ii) मधील तरतुदीनुसार व या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२/११/ (५)/मा.ता.(इढोळे)/२७६/२००८, दि.१२/१०/२०१० मधील तरतुदीनुसार त्यांची सपोनि पदातील मुळ सेवाज्येष्ठता अद्याप निश्चित करण्यात आली नसल्याने. |
| ४०६ | सुनिल तानाजी बच्छाव | श्री.बच्छाव यांची प्रथम नियुक्ती पो.शिपाई पदावर दि.१०/१२/१९९० रोजी अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून झाली आहे. त्यानंतर त्यांची खात्यामार्फत सरळसेवा भरतीने अनुसूचीत जमाती या प्रवर्गातून पोउपनि पदावर निवड झाल्याने दि.१/०४/२००४ पासून त्यांना महाराष्ट्र पोलीस अकादमी येथे पोउपनि पदाच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले होते. त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र दि.२२/०४/२०१३ रोजी सादर केले आहे. ते शासन सेवेत दि.१५/०६/१९९५ पुर्वी दाखल झाले असल्यामुळे त्यांना शासन निर्णय दि.२४/०६/२००४ मधील तरतुदीनुसार संरक्षण प्राप्त होते. त्यानुसार क्र.पोमसं/५/१०/जातपडताळणी-बच्छाव/१५३/२०१३, दि.१/०८/२०१५ अन्वये त्यांची पोउपनि पदातील दि.१/०६/२००४ ची विशेष मागास प्रवर्गातून सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात आली आहे. सबब शासन निर्णय दि.३०/०६/२००४ मधील तरतुदीनुसार **विशेष मागास प्रवर्गातून** सपोनि या पदातील सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात आली नसल्याने. |

**( राजकुमार व्हटकर )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता

प्रति,

महासंचालक, ॲन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / नाहसं / वाहतूक / लोहमार्ग / दहशतवाद विरोधी पथक / विशेष कृती महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गुअवि, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (बृहन्मुंबई व लोहमार्ग सह)
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, विसुवि, दादर, मुंबई / फोर्स वन, कालिना, मुंबई / नक्षल विरोधी अभियान, नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र

सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग पुणे व लोहमार्ग नागपूर सह)
पोलीस अधीक्षक, विशेष कृती, नागपूर
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्रे

प्रत,
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक ३ / ५ / १४-अ

२/- कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र.५ यांना कळविण्यात येते की, संदर्भात नमूद दि.११/०२/२०१६ च्या आदेशांतील निधन झालेले / निलंबनात असलेले / सेवानिवृत्त झालेले / अदयाप पोलीस उप निरीक्षक असलेले काही अधिकारी आढळून आल्यास त्यांची नावे तात्काळ या कार्यासनास कळविण्यात यावी.